**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**सोमवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२६**

**ठळक बातम्या**

1. **राज्यात एसआयआर मोहिमेअंतर्गत तयार करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी आज प्रसिद्ध; २१ पूर्णांक १४ टक्के मतदार विविध कारणास्तव असामाविष्ट.**
2. **राज्यातल्या अनुदानित खासगी वरिष्ठ महाविद्यालयांमधे सहयोगी प्राध्यापकाची ५ हजार १२ पदं भरण्यासाठी राज्यशासनाची मंजुरी.**
3. **देशात चिप उत्पादनाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारच्या सेमीकॉन योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात १ लाख २७ हजार कोटी रुपयांची तरतूद.**
4. **नेपाळमध्ये ९०३ पूरबळींचे मृतदेह सापडले; ४ हजारांपेक्षा जास्त जण अद्याप बेपत्ता.**

**आता सविस्तर बातम्या .......**

प्रारूप मतदार यादी

राज्यात एसआयआर अर्थात मतदार याद्यांची फेरतपासणी आणि सुधारणा मोहिमेअंतर्गत महाराष्ट्रातील सर्व 288 विधानसभा मतदारसंघाच्या प्रारुप मतदार याद्या आज प्रसिद्ध करण्यात आल्या. या मतदार याद्या भारत निवडणूक आयोगाच्या वोटर सर्विस पोर्टलवर तसंच मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांच्या संकेतस्थळावर तसेच संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर नागरिकांसाठी उपलब्ध आहे. विशेष सखोल पुनरीक्षणापूर्वी महाराष्ट्रात एकूण नऊ कोटी 78 लाख 54 हजार 49 इतके मतदार होते त्यापैकी विविध कारणांमुळे गणना प्रपत्र प्राप्त न झाल्यामुळे 21.14% म्हणजेच दोन कोटी सहा लाख 88 हजार 487 मतदारांचा या यादीत समावेश करण्यात आलेला नाही. प्रारूप मतदार यादीत समावेश नसलेल्या मतदारांमध्ये नागपूर जिल्ह्यातील 14 लाख 43 हजार 267 मतदारांचा समावेश आहे . .अमरावती जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदार संघाची प्रारूप मतदार यादी देखील आज प्रसिद्ध करण्यात आली. अमरावती जिल्ह्यात 18 जून 2026 रोजी एकूण 25 लाख 45 हजार 677 मतदार होते. विशेष पुनरीक्षण कार्यक्रमानंतर आज प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादीत एकूण 21 लाख 92 हजार 395 इतकी जिल्ह्यातली मतदार संख्या आहे. मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र मतदारांनी 30 सप्टेंबर पर्यंत संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडे आपले दावे आणि आक्षेप नोंदवावेत असं आवाहन करण्यात आलं आहे.

सहयोगी प्राध्यापक भरती

राज्यातल्या अनुदानित खासगी वरिष्ठ महाविद्यालयांमधे सहयोगी प्राध्यापकाची ५ हजार १२ पदं भरण्यासाठी राज्यशासनाने मंजुरी दिली आहे, तसंच भरतीच्या वेळी मुलाखतीचं सीसीटीव्ही चित्रीकरण अनिवार्य करण्यात आलं आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण विभागने आज त्याची अधिसूचना जारी केली. विद्यार्थी पटसंख्या आणि कार्यभार यासंबंधी ऑक्टोबर २०२५मधे तयार केलेल्या समीकरणानुसार ही पदं मंजूर केली आहेत. संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठ आयोगाच्या

नियमांनुसार पदभरतीची प्रक्रीया करावी असं अधिसूचनेत म्हटलं आहे. मुलाखतीचं चित्रीकरण मुलाखतीच्या दिवसापासून एक वर्षासाठी सांभाळून ठेवावं असंही शासनाने सांगितलं आहे.

INS निपुण

स्वदेशी बनावटीचं INS निपुण हे जहाज आज भारतीय नौदलाच्या सेवेत दाखल झालं. खोल समुद्रातली डायव्हिंग, पाण्याखालची तपासणी आणि संकटात सापडलेल्या पाणबुड्यांच्या बचावासाठी हे जहाज महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. INS निपुणमध्ये अत्याधुनिक डायव्हिंग उपकरणं, पाण्याखालील रोबोट्स, वैद्यकीय सुविधा आणि पाणबुडी बचाव यंत्रणा उपलब्ध आहेत.

भटक्या-विमुक्त जाती दिन

विमुक्त समाजाला घटनात्मक हक्क, सन्मान आणि न्याय मिळवून देत स्थिर आणि चिंतामुक्त जीवन देण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मुंबईतील माटुंगा इथं आयोजित 'शिवसेना भटके विमुक्त हक्क, न्याय व विकास परिषद २०२६'मध्ये ५२ भटक्या-विमुक्त समाजांना एकत्र आणून त्यांच्या हक्कांसाठी देशव्यापी चळवळ उभी करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. शिक्षण, रोजगार, निवारा, आरोग्य, कौशल्य विकास आणि उद्योगांच्या माध्यमातून समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यावर सरकारचा भर असल्याचं शिंदे यांनी सांगितलं. भटक्या-विमुक्त समाजाच्या लोककला, हस्तकला आणि पारंपरिक व्यवसायांच्या जतनासाठी राज्यस्तरीय संमेलन घेण्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली.

सेमीकॉन योजना

देशात चिप उत्पादनाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारनं सेमीकॉन योजनेचा दुसरा टप्पा सुरू केला आहे. यासाठी १ लाख २७ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. भारतीय कंपन्यांनी या चिप्सची रचना करणं, त्यांच्या उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या उपकरणांसाठी उत्पादन केंद्रं उभारणं, सेमींकडक्टर फॅब्स, चिप्सची जोडणी, पॅकेजिंग आणि चाचण्या अशा सहा भागांचा समावेश या योजनेत करण्यात आला आहे. सेमीकंडक्टर उद्योगाच्या संपूर्ण मूल्यसाखळीला आर्थिक पाठबळ देण्यात येईल, असं सरकारनं याबद्दलच्या अधिसूचनेत म्हटलं आहे.

फडणवीस मानद डी.लिट

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या वतीने मानद डी.लिट. उपाधी प्रदान करण्यात आली. मराठवाडा कृषी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ नुकताच पार पडला, त्यावेळी काही अपरिहार्य कारणांमुळे फडणवीस यांना उपस्थित राहता आलं नव्हतं. त्यामुळे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्र मणी यांनी काल नागपूर इथं एका छोटेखानी समारंभात त्यांना सन्मानपूर्वक ही  पदवी प्रदान केली.

इराण-अमेरिका

अमेरिकेनं काल रात्री होर्मूझ सामुद्रधुनीतल्या लारक बेटावरच्या इराणच्या लष्करी ठाण्यांवर हल्ले केले. या हल्ल्यांमध्ये अनेक इराणी सैनिक आणि नागरिक मारले गेल्याचं वृत्त इराणच्या सरकारी प्रसारण सेवेनं दिलं आहे. यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर पुन्हा वाढले आहे. ब्रेंट

क्रूडचे दर ९० डॉलर्स प्रतिबॅरलवर पोहोचले, तर डब्ल्यू टी आय क्रूड ८६ डॉलर्स प्रतिबॅरलवर पोहोचलं आहे.

नेपाळ पुर

नेपाळमध्ये आलेल्या पुरानंतर मदत, बचाव आणि शोधकार्य आजही सुरू आहे. आतापर्यंत ९०३ जणांचे मृतदेह सापडले असून ४ हजारांपेक्षा जास्त जण अद्याप बेपत्ता असल्याची माहिती नेपाळच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिली आहे. बेपत्ता झालेल्यांमध्ये नेपाळचं पोलीस दल, लष्कर तसंच सरकारी कार्यालयातल्या कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. नेपाळमधल्या रुग्णालयांमध्ये मृतदेहांची ओळख पटवण्याचं काम सुरू आहे. या कामासाठी डीएनए विश्लेषणात तज्ज्ञ असलेल्या भारताच्या १८ सदस्यांच्या न्यायवैद्यक तज्ज्ञांचं पथक नेपाळमध्ये दाखल झालं आहे. इथल्या चिलिमे आणि लांगटांग परिसरातल्या जलविद्युत प्रकल्पांच्या बोगद्यांमध्ये शेकडो जण अडकले असून त्यांना बाहेर काढण्यासाठी भारत आणि नेपाळच्या पथकांकडून शोध आणि बचावकार्य सुरू आहे. पूरबाधित जिल्ह्यांमधून आतापर्यंत एकूण १० हजारांपेक्षा जास्त लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आलं असून ३ हजारांपेक्षा जास्त नेपाळी नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आलं आहे. दरम्यान, ४०३ भारतीय नागरिक चीनमधून सुरक्षितपणे नेपाळमध्ये पोहोचले असून, ५०० भारतीय नागरिक चीनमध्ये सुरक्षित आहेत. राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडे आपत्तीग्रस्त भागात अडकलेल्या ४०४ नागरिकांची नोंद झाली आहे.

'लोकअभिरक्षक' प्रणाली

गरजू आणि गरीब बंदीवानांना मोफत आणि प्रभावी कायदेशीर मदत मिळावी यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या पुढाकाराने १३ मार्च २०२३ रोजी सुरू करण्यात आलेली 'लोकअभिरक्षक' प्रणाली आधारदायी ठरत आहे. या प्रणालीकडे वर्धा जिल्ह्यात आतापर्यंत १ हजार ३९४ प्रकरणे प्राप्त झाली असून, त्यापैकी ७८३ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. निकाली निघालेल्या प्रकरणांपैकी सुमारे निम्म्या प्रकरणांत न्यायालयाने दोषमुक्ती दिल्याचे सांगण्यात आले. आर्थिक परिस्थितीमुळे न्यायालयीन लढाई लढणे शक्य नसलेल्या पात्र बंदीवानांना लोकअभिरक्षकांकडून मोफत कायदेशीर मार्गदर्शन आणि न्यायालयीन प्रतिनिधित्व दिलं जातं.

बुढीचा चिवडा

कापूस आणि ग्रामीण संस्कृतीसोबतच यवतमाळची ओळख बनलेल्या 'बुढीचा चिवड्या'ला आता जागतिक स्तरावर नेण्याचा संकल्प एस.एल. फाउंडेशनने केला आहे. १९३६ मध्ये अवघ्या एका आण्यात शेतकऱ्यांसाठी सुरू झालेल्या या व्यवसायाला तब्बल ९० वर्षांची परंपरा लाभली असून, आज तो यवतमाळच्या खाद्यसंस्कृतीचा अविभाज्य भाग बनला आहे. याच पारंपरिक चिवड्याचा विश्वविक्रम करण्यासाठी २७ ऑक्टोबरला तब्बल १० हजार पायली चिवडा तयार करण्याचा उपक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

कृषी निविष्ठा

कृषी निविष्ठांच्या विक्रीव्यवहारात पारदर्शकता आणण्यासाठी वाशिमसह राज्यातील ९ जिल्ह्यांत २५ ऑगस्टपासून सुरू करण्यात आलेल्या क्यूआर कोड-आधारित खत विक्री उपक्रमात वाशिम जिल्हा तिसऱ्या स्थानी राहिला आहे. २५ ते २८ ऑगस्ट या कालावधीतील उपलब्ध आकडेवारीनुसार, जिल्ह्यात ३,०८९ शेतकऱ्यांनी क्यूआर पद्धतीने खतासाठी नोंदणी केली. त्यापैकी १,९१७ शेतकऱ्यांना प्रत्यक्षात ४६१ मेट्रिक टन खताची विक्री करण्यात आली.

संशयित गांजा

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील रेल्वे सुरक्षा दलाने 'ऑपरेशन नार्कोस'अंतर्गत कारवाई करत सुमारे सव्वा पाच लाखांचा  १०.४७० किलो संशयित गांजा जप्त करून एका व्यक्तीला ताब्यात घेतलं. मुंबई CSMT साप्ताहिक सुपरफास्ट एक्स्प्रेसमध्ये सिंदी-वर्धा दरम्यान झालेल्या या कारवाईत ताब्यातील व्यक्ती आणि मुद्देमाल GRP वर्धा यांच्या स्वाधीन करण्यात आला असून गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे.

तपासणी अन् सल्ला' अभियान

गोंदिया जिल्ह्यात ३० वर्षांवरील नागरिकांच्या असंसर्गजन्य आजारांचे वेळीच निदान आणि उपचारासाठी '३० वर्षांचा पल्ला, तपासणी अन् सल्ला' अभियान १ सप्टेंबर ते १० डिसेंबरदरम्यान राबविण्यात येणार आहे. अभियानांतर्गत मधुमेह, उच्च रक्तदाब तसेच तोंड, स्तन आणि गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची मोफत प्राथमिक तपासणी करण्यात येणार आहे. गोंदियावासीयांनी जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रात जाऊन मोफत आरोग्य तपासणी करून घ्यावी, असं आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी झेनिथ दोंतुला यांनी केलं आहे.

*****